'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal
मराठी साहित्य संशोधन विशेषांक Vol. 2 Issue. 3
ISSN :2348-7143 (Online)
July-Sept.- 2015

# वासुदेव

**प्रा. अंजली मुकुंद पांडे**
बॅरि. शेषराव वानखेडे महा. खापरखेडा
मो. ९८२२३६७२४२

*वासुदेव ही लोकसंस्था प्राचीन काळापासून महाराष्ट्राच्या लोकमानसावर अधिराज्य गाजवित आली आहे. पूर्वी गावातील घरासमोर उभे राहून हाताने टाळ-चिपळ्याा वाजविणारा, गावागावाच्या यात्रा-जत्रांमधून आख्यान गायन करून ठुमकत चालणारा, आपल्या पदविन्यासाने आबालवृध्दांना मोहिनी घालणारा हा वासुदेव आताशा क्वचित आढळतो. या लोकधर्मी संस्थांचा ऱ्हास म्हणजे महाराष्ट्राच्या वैभव संपन्न संस्कृतीचा ऱ्हास होय. गायन, वादन, नृत्य आणि अभिनयाचे अंग असणारा 'वासुदेव' हा अभिजात कलावंत होय. प्रचीन काळापासून चालत आलेल्या या लोककलावंतांनी महाराष्ट्राची कलाभिरुची अधिक समृद्ध व श्रीमंत करून ठेवली आहे,*

लोककलांची आणि लोककलावंतांची महाराष्ट्राला समृद्ध आणि श्रीमंत परंपरा लाभली आहे. लोकपरंपरेने आणि संतपरंपरेने मराठी वाङ्मयाला आणि लोककलांना अमूल्य योगदान दिले आहे. या लोकधर्मी कला सांस्कृतिक अविष्काराचे तसेच सामाजिक मूल्ये व जीवन मूल्ये यांच्या प्रकटनाचे एक कलात्मक साधन आहे. पारंपारिक लोकधर्मीय कलाप्रकारात धार्मिक विधीला अत्याधिक महत्वाचे स्थान होते. त्यांचे स्वरूपही धार्मिक आराधनेचेच प्रकट होते. त्यामुळे या लोककलाप्रकारांविषयी लोकमानसात श्रद्धेची भावना होती. महाराष्ट्रात गोंधळ, लळित, दशावतार, दंढार इत्यादी वैविध्यपूर्ण व वैशिष्ट्यापूर्ण विधीनाटये व लोककलाप्रकार दिसून येतात. या सर्वांच्या निर्मितीची बीजे कोणत्या ना कोणत्या दैवतांच्या उपासनाविधीमध्ये सापडतात. हे सर्व कलाप्रकार भक्तीभावनेबरोबरच कलानंदही प्रदान करतात. भक्ती, उद्‌बोधन आणि मनोरंजन असे या कलांचे तिहेरी स्वरूप असल्याचे दिसते. या लोककलाप्रकारांना इथल्या परंपरेचा वारसा लाभला आहे. या कलाप्रकारात आध्यात्मिकतेबरोबरच मनोरंजनाचीही गुंफण असल्याने हे सर्व कलाप्रकार जनमानसाने सहर्ष स्विकारले, आत्मियतेने जोपासले. कडकलक्ष्मी, गोंधळी, वासुदेव, चित्रकथी, जोगती-जोगतीण, नंदीवाले, पांगूळ, पोतराज, बहुरूपी, भुत्या, भराडी, वाघ्यामुरळी अशा विविध रूपांमध्ये हे लोककलावंत दिसून येतात.

या सर्व कलावंतामधील 'वासुदेव' हा मराठी संस्कृतीतील 'सात्विक लोककलावंत' आहे. 'दान मागणारी धार्मिक भिक्षेक-याची भटकी जमात' असा यांचा उल्लेख केला जातो. 'या वासुदेवाला 'धुकोट' असेही म्हणतात'. प्राचीन काळापासून चालत आलेल्या 'वासुदेव' या लोकप्रकाराच्या उद्‌भवाविषयी नेमकेपणाने सांगता येत नाही. वासुदेव आणि देवकीचा मुलगा वासुदेव होय. गोप गोपिकांसह रानात गायी चरायला नेणे हा त्याचा नित्यक्रम. त्याच्या वंशध्वनीने गोपगोपींसह गायी वासरांचीही मने तृप्त होत असतं. 'धर्मसंस्थापनार्थ' द्वापारयुगी 'नंदकुमार श्रीहरी' म्हणून अवतरलेल्या या श्रीकृष्णाचे कलियुगातले 'प्रबोधनकारी' रूप म्हणजे 'वासुदेव' होय; अशी परंपरागत लोकधारणा असल्याचे दिसते.प्राचीन काळातील वाङ्मयातून वासुदेवाच्या ईशजागरपर व लोकजागरपर रूपाचेच संदर्भ आल्याचे दिसते. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, कान्होबा इत्यादी संतांच्या साहित्यात वासुदेवावरील रूपके आढळतात. 'चक्रधरस्वामींचे गुरू श्रीगोविंदप्रभू यांच्या चरित्रातही 'श्रीडी' या नावाने वासुदेवाचा उल्लेख आलेला आहे. वासुदेवाच्या वृत्तीत आणि कृतीत जशी सात्विकता आहे तशीच त्यांच्या 'वासुदेव होण्याच्या विधीतही' आहे. वासुदेव होण्याचा विधी अतिशय सहज सुलभ असून अतिशय साधेपणाने पार पाडल्या जातो. वासुदेव आपल्या मुलाला 'वासुदेव' करण्यासाठी उपाध्यायांमार्फत दीक्षा देतो. हा दीक्षाविधी मुलगा पंधरा

वर्षाचा होण्यापूर्वी करण्याचा प्रघात आहे. उपाध्याय मुलास वासुदेवाचा वेश चढवून विधीवत त्याच्या कपाळी चंदनाचा टिळा लावतो. मुलाचे कुटुंबीय व नातलग यांच्या साक्षीने हा पूजाविधी संपन्न होतो.

वासुदेवाची गाणी :-

वासुदेवाची गाणी वैविध्यपूर्ण, आशयघन, सुबोध व रसाळ आहेत. पुराणकथा, कृष्णकथा यासोबतच सामाजिक विषयांनाही स्पर्श करतात. त्यांच्या गाण्याचे स्वरूप उद्बोधनात्मक आहे. रामप्रहरी 'दान पावलं'चा जयघोष करणा-याा या लोकधर्मीने ईशस्तुती बरोबरच नैतिकतेचीही कवनं गायिली. वेदांत विवेचनाबरोबरच आदर्श महापुरूषांचीही चरित्रेही त्यांनी आपल्या गाण्यातून वर्णिली आहे. भक्तिमहिमा, प्रपंच्याची असारता, सदाचार यांनाही त्यांनी आपल्या गाण्याचे विषय बनविले.

**संतसाहित्यातील वासुदेवाचे रूपक :-**

वासुदेवाच्या स्वरुपात आध्यात्मिक रूपक योजून भगवद्भक्ती, नीतीबोध, व्यवहारज्ञान व प्रपंचविज्ञान विशद करणारा लोकशिक्षक म्हणून वासुदेवाला निर्देशित करण्यात मराठी संतपरंपरेचा फार मोठा वाटा आहे. पारंपारिक वासुदेवाचे तत्वदर्शी व विवेचक स्वरूप मराठी संतांनी मांडले आहे.

***' हरे राम कृष्णा / वासुदेव जाणवितसे जना /***
***चिपळ्याा टाळ हाती विणा / मुखी घोष नारायणा गा //'***

( सकल संत गाथा- कान्होबा महाराज )

एका हातात टाळ आणि एका हातात चिपळ्याा घेऊन फिरणाऱ्या या वासुदेवाच्या डोक्यावर मोरपिसांची टोपी आहे. मुखाने नारायणाचा जयघोष करणाऱ्या वासुदेवाचे 'रूपडे' अतिशय सात्विक व मोहक आहे.

***' थुळथुळा वाजती टाळ / क्षणक्षणा नाद रसाळ /***
***उदो आली पाहाली वेळ / उठा वाचे वदा गोपाळ // '***

( सकल संत गाथा-ज्ञानेश्वर महाराज)

टाळांचा मधुर व रसाळ नाद करीत अंगणात प्रसन्न मुद्रेने उभा राहाणारा वासुदेव भगवन्नामाची आणि भगवंताच्या नामस्मरणाची महती सांगत आहे.

***' गांवा आंत बीरी हिंडे आळी /***
***देवो देविची केली चिपळी /***
***चरण नसता वाजे धुमाळी /***
***ज्ञानदेवांची कांती सांवळी /***

(सकल संत गाथा-ज्ञानेश्वर महाराज)

सर्वत्र मुक्तपणे संचार करणाऱ्या वुदेवाच्या मनी ' सांवळी कांती ' असणाऱ्या मुरलीमनोहराचे अविरत स्मरण सुरु आहे. त्याच्या हातातील चिपळ्यांचा आणि पायातील घुंघरांचा नाद अंगणभर निनादत आहे. या कर्णमधुर नादाने सभोवतीचे वातावरण अधिक प्रसन्न, प्रफुल्ल व मंगलमय झाले आहे.

***' गातो वासुदेव मी ऐका /***
***चित्त ठायी ठेवुनि भावे ऐका //***

(सकल संत गाथा-कान्होबा महाराज)

श्रीकृष्णाच्या सांवळ्या रूपात, त्याच्या प्रत्ययकारी नामात असीम प्रसन्नता आहे. देवकीनंदनाला हृदयमंदिरात विराजमान करून आणि त्याच्या ठायी चित्त दृढ ठेवून ही प्रसन्नता अनुभवावी असे वासुदेव सांगतो.

भारुडातील वासुदेवाचे रुपक :-

एकनाथांनी भारूडाच्या माध्यमातून समाजात नैतिकता व आध्यात्मिकता रुजविण्याचा प्रयत्न केला. वाणी व लेखणी यांना प्रबोधनाचे माध्यम बनविले. भजन कीर्तन याद्वारे प्रभावीपणे लोकजागर केला. सर्वसामान्यांचे अनुभवविश्व त्यांनी शब्दातून अधोरेखित केले. लोकजागरणासाठी भारूडासारखा सशक्त पण सुबोध लोकरूढ लोकबंध स्विकारला. नाथांच्या भारुढाचे विषय बहुविध आहेत. यासाठी त्यांनी तत्कालीन समाजात बहुरूढ व लोकपरिचित अशा रूपकांचा आधार घेतला. नाथांनी योजलेले 'वासुदेवाचे रूपकही असेच प्रबोधनपर आहे. 'भगवन्नामाची आसक्ती व प्रपंचाची अनासक्ती' असा बोधमंत्र देणाऱ्या वासुदेवाचे गुणवैशिष्ट्या सांगतांना एकनाथ महाराज म्हणतात,

*' सुखदु:खासमान सकळ जीवांचा कृपाळ ।*
*ज्ञानाचा उद्बोध भक्तिप्रेमाचा कल्लोळ ॥*
*विषयी विरक्त जया नाही आपपर ।*
*संतुष्ट सर्वदा स्वये व्यापक निर्धार ॥*
*जाणीव शहाणीव वोझे सांडोनिया दुरी ।*
*आपण वस्तीकर वर्ततसे संसारी ॥*

(सकल संत गाथा-एकनाथ महाराज)

सुखदु:ख समान मानणारा, विरक्त, कृपाळू, संतुष्ट, निराभिमानी, सर्वाठायी समत्व बुद्धी असणारा असा हा वासुदेव या संसारात एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी विमुक्तपणे विहरतो.

*' मी वासुदेव नामे फोडितो नित्य टाहो ।*
*देखिले पाय आता मागतो दान द्याहो ।*
*सांवळे रूप माझ्या मानसी नित्य राहो ।*
*पावन संतवृंदे सादरे दृष्टी पहा हो । '*

( तत्रैव )

'काम, क्रोध, मद, मत्सर, अहंकार झोडी' अशा शब्दात दारोदार हिंडून समाजभान आणि आत्मभान जागृत करणारा हा वासुदेव खरा समाजशिक्षक आहे. 'सांवळे रूप' आपल्या मनोमंदिरात विराजमान व्हावे अशी कामना करणारा हा वासुदेव सर्वांना 'अखंड सुखसोहळ्याची' अनुभूती प्रदान करतो.

*' हे दान पावले सद्गुरू शांतिलिंगा ।*
*हे दान पावले आत्मया पांडुरंगा ।*
*हे दान पावले व्यापका अंतरंगा ।*
*हे दान पावले एका जनार्दनी दोष जाती भंगा । '*

( तत्रैव )

दान सूपभर मिळो नाहीतर पसाभर मिळो, ज्यानं दान दिलं त्याचं दान ईश्वरापर्यंत पोहचल्याचं आनंदानं सांगतो. देणाऱ्याला तोंडभरून आशीर्वाद देतो.

**लोकजीवनातील वासुदेव :-**

पहाटेच्यावेळी वासुदेव हातातील टाळ व चिपळ्यांच्या तालावर पाऊले टाकीत आपल्या सुमधुर गाण्याने घराघरांचे अंगण प्रसन्नतेने भरून टाकतो. निराशेचा अंध:कार दूर सारून आशेची पहाट घेऊन येणाऱ्या प्रकाश किरणांच्या साक्षीने 'नको गुंतू विषयकामा। तुम्ही आठवा मधुसूदना' असे वासुदेव सांगू लागतो. वासुदेवाच्या रूपात श्रीकृष्णच साक्षात उभा आहे अशी त्यावेळच्या लोकांची धारणा होती. घरची गृहलक्ष्मी हातातील काम थांबवून वासुदेवाला दान देण्यासाठी सूपभर धान्य घेऊन येईपर्यंत गण, गवळण, आख्यान, पद असे त्याचे गायन चालू असे. लहानगे देखिल त्याचे 'सात्विक रूपडे' बघून त्याच्याभोवती गोळा होत. 'दान पावलं' असे लयीत म्हणत गृहलक्ष्मीला आर्शीवचन देऊन गिरकी घेणाऱ्या वासुदेवाच्या पदन्यांसावर बालगोपालही लुब्ध होत. पण हळूहळू बदलत्या सामाजिक संदर्भानुसार हे चित्र पालटलं. समाजाला चैतन्य व सामाजिक समरसतेच भान देणाऱ्या या लोकधर्मींच समाजातील महत्व आणि महती कमी होवू लागली. समाजाला नैतिक अधिष्ठान देणाऱ्या या संस्थांकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोण बदलला आणि या आध्यात्मिक व पबोधनकारी लोकसंस्था केवळ 'भिक्षेकरी' म्हणून उरल्या. या बदलत्या समाजभानाची नोंद वासदेवांच्या चाणाक्ष नजरेने व सूक्ष्म निरीक्षण शक्तीने घेतली. त्याचे प्रतिबिंब त्यांच्या उक्ती कृतीतून पडू लागले. लोकांची दान देण्याची वृत्ती क्षीण झाली. गावोगाव हिंडूनही उपासमार होवू लागली.

वासुदेव ही लोकसंस्था प्राचीन काळापासून महाराष्ट्राच्या लोकमानसावर अधिराज्य गाजवित आली आहे. पूर्वी गावातील घरासमोर उभे राहून हाताने टाळ-चिपळ्याा वाजविणारा, गावागावाच्या यात्रा-जत्रांमधून आख्यान गायन करून ठुमकत चालणारा, आपल्या पदविन्यासाने आबालवृध्दांना मोहिनी घालणारा हा वासुदेव आताशा क्वचित आढळतो. या लोकधर्मी संस्थांचा ऱ्हास म्हणजे महाराष्ट्राच्या वैभव संपन्न संस्कृतीचा ऱ्हास होय. गायन, वादन, नृत्य आणि अभिनयाचे अंग असणारा 'वासुदेव' हा अभिजात कलावंत होय. प्रचीन काळापासून चालत आलेल्या या लोककलावंतांनी महाराष्ट्राची कलाभिरूची अधिक समृद्ध व श्रीमंत करून ठेवली आहे, यात तिळमात्र शंका नाही.

**संदर्भसूची :-**


१. महाराष्ट्र संस्कृतिकोश -संपा. डॉ. दुर्गा दीक्षित
२. लोकसंस्कृतीचे उपासक - रा. चि. ढेरे
३. मुंबई इलाख्यातील जाती - श्री. गो. म. कालेलकर
४. सकल संत गाथा - साखरे महाराज
५. लोकसाहित्य : शब्द आणि प्रयोग - डॉ. साहेब खंदारे